**पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी**

२ रा मजला, वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.

जाहिरात क्र. ७८७ /२०१७

क्र.वैद्य/०९/कावि/ १२७३ /२०१७

दि. २०/ ०९ /२०१७.

**Walk - In -Interview (थेट मुलाखत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) साठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरावयाची आहेत. याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रवर्गानुसार आरक्षण | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | १० | ४०,०००/- | **किमान अर्हता-**एम.बी.बी.एस. **तांत्रिक अर्हता-** महाराष्ट्र मेडिकल कैन्सील कडील नोंदणी आवश्यक अनुभव असल्यास प्राधान्य | १८ ते ४५ वर्षे ( सेवा निवृत्त शासकिय अधिकारी असल्यस वयोमर्यादा कमाल ६५ वर्षापर्यंत राहील.) | अनुसुचित जाती- १<br>अनुसुचित जमाती-१<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.क.-१<br>इ.मा.व.-२<br>खुला- ४ | दि.३/१०/२०१७ |
| २ | ए.एन.एम | १३ | ८,३१४/- | **किमान अर्हता-** १० वी उत्तीर्ण, **तांत्रिक अर्हता-** एन.एन.एम.कोर्स उत्तीर्ण, एमएनसी नोंदणी आवश्यक तसेच क्षेत्रीय कामकाज व लसीकरण याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | १८ ते ३८ वर्षे | अनुसुचित जाती- ३<br>इ.मा.व.-३<br>खुला- ७ | दि.५/१०/२०१७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | स्टाफ नर्स | ११ | १०,८००/- | **किमान अर्हता-** १० वी पास मान्यता प्राप्त विद्यापीठ,बोर्ड, शाळा व समतुल्य.<br><br>**तांत्रिक अर्हता-** अ दर्जाचे नर्सींग प्रमाणपत्र मान्यताप्राप्त विद्यालयाकडील मीडवायफ प्रमाणत्र मान्यता प्राप्त नर्सींग कौंसीलकडील नर्स व मिडवायफ अ दार्जाची नोंदणी आवश्यक. १०+२, सायन्स शाखा (फिजीक्स ,केमेस्ट्री, बायोलॉजी) मान्यताप्राप्त बोर्डाकडील असणे आवश्यक. वार्ड/आय.सी.यु/ओटी या मधील नर्सींग कामकाजाचे कौशल्य असणे आवश्यक. नर्सींग या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | १८ ते ३८ वर्षे | अनुसुचित जाती- १<br>अनुसुचित जमाती-२<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.ड.-१<br>इ.मा.व.-३<br>वि.मा.प्र.-१<br>खुला- २ | दि.४/१०/२०१७ |
| ४ | लॅब टेक्नीशियन | ०१ | ७,०००/- | **किमान अर्हता-** १०+२, विज्ञान शाखा (फिजीक्स ,केमेस्ट्री, बायोलॉजी) मान्यताप्राप्त बोर्डाकडील असणे आवश्यक.<br><br>**तांत्रिक अर्हता-** बी.एस.सी (एम.एल.टी.) किंवा डी.एम.एल.टी. डिल्पोमा प्रमाणपत्र- मान्यताप्राप्त विद्यालयाकडील.<br><br>संगणक (Ms, Excel and Word skill evaluation) या कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक.<br><br>लॅब सहाय्यक या कामाचा अनुभव. | १८ ते ३८ वर्षे | खुला- १ | दि.३/१०/२०१७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | फार्मासिस्ट | ०५ | ८,०००/- | **किमान अर्हता-** १०+२, विज्ञान शाखा (फिजीक्स ,केमेस्ट्री, बायोलॉजी) मान्यताप्राप्त बोर्डाकडील असणे आवश्यक.<br><br>**तांत्रिक अर्हता-** बी.फार्मासी, मान्यताप्राप्त विद्यालयाकडील व फार्मासी कौंसील कडील नोंदणी असणे आवश्यक.<br>**किंवा**<br><br>डिप्लोमा इन फार्मासी, मान्यताप्राप्त विद्यालयाकडील व फार्मासी कौंसील कडील नोंदणी असणे आवश्यक.<br><br>संगणक कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक<br>फार्मासिस्ट या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | १८ ते ३८ वर्षे | अनुसुचित जमाती- १<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.क- १<br>खुला- २ | दि.३/१०/२०१७ |
| ६ | डेटा एन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल (युपीएचसी) | ०२ | ९,६००/- | **किमान अर्हता-** बी.कॉम पदवीधर,<br>**तांत्रिक अर्हता-** अद्ययावत टॅली व संगणकाचे ज्ञान, मराठी व इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. शासनमान्य प्रमाणपत्र आवश्यक.<br>२ वर्षे लेखा विषयक कामकाजाचा अनुभव आवश्यक. | १८ ते ३८ वर्षे | इ.मा.व.-१<br>खुला- १ | दि.४/१०/२०१७ |
| ७ | अटेडंन्ट (मदतनीस) | ०४ | ६,०००/- | **किमान अर्हता-** ८ वी पास मान्यताप्राप्त शाळेकडील असणे आवश्यक.<br>तांत्रिक साधने उदा.झेरॉक्स मशीन, फक्स, स्कॅन मशीन व प्रिन्टर हाताळणेबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य. | १८ ते ३८ वर्षे | भ.ज.ब.-१<br>इ.मा.व.-१<br>खुला- २ | दि.४/१०/२०१७ |

**<u>अटी व शर्ती-</u>**

१. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या सर्व उमेदवारांची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.

२. मुलाखती दरम्यान स्टाफनर्स, लॅब टेक्नीशियन, फार्मसिस्ट व अटेडंन्ट (मदतनीस) या पदांची कौशल्य मुल्यमापन चाचणी घेणेत येईल.

३. मुलाखती दरम्यान अटेडंन्ट (मदतनीस) या पदाची ६० गुणांची बहुपर्यायी चाचणी परिक्षा घेणेत येईल.

४. मुलाखती दरम्यान वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ), ए.एन.एम. व डेटा ऐन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल या पदांची कौशल्य मुल्यमापन चाचणी न घेता थेट संबंधीत पदाचे कामकाजाबाबत (उदा. अनुक्रमे राष्ट्रीय कार्यक्रम कामकाज, क्षेत्रीय कामकाज व लसीकरण, लेखा विषयक कामकाज) मुलाखत घेणेत येईल.

५. सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. अस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

६. सदर पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने प्रकल्पासाठी भरावयाची असुन प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

७. सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

८. सदर पदांचे संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

९. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१०. मुलाखत एकास पाच (१:५) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल. याकरिता उपरोक्त नमुद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास पहिल्या १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय मा.सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक, पिं.चिं.म.न.पा. यांचा राहील.

११. जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार पदवी/पदवीका/स्टाफनर्स/ए.एन.एम.कोर्स/फार्मासिस्ट/डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल(युपीएचसी)/अटेंडन्ट/प्रयोगशाळा तंत्रज्ञ इ. शैक्षणीक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

१२. मुलाखत एकुण १०० गुणांची परीक्षा राहील.

१३. या मध्ये पदवी/पदवीका/स्टाफनर्स/ए.एन.एम.कोर्स/फार्मासिस्ट/डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल(युपीएचसी)/अटेंडन्ट/प्रयोगशाळा तंत्रज्ञ या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात येतील.

अ)शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.

ब) २० गुण अतिरिक्त शिक्षण, अनुभव, कौशल्य चाचणी व विषय ज्ञानावर आधारीत राहतील.

१४. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१५. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

१६. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्ती वेतन अशी जी रक्कम येईल ती मानधन म्हणुन देण्यात येईल.

**कागदपत्रे-**

१. इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा.वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्रे व खालील कागदपत्रे यांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात अर्जासोबत मुळ प्रमाणत्रे जोडू नयेत.

१. पासपोर्ट साईज फोटो २. जन्मतारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) ३. रहिवाशी दाखला ४. ओळख प्रमाणपत्र ५. पदानुसार शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र ६.जातीचा दाखला ७.अनुभव प्रमाणपत्र

१७. **मुलाखतीचे ठिकाण**- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वाय.सी.एम.एच.) पहिला मजला, चाणक्य हॉल, पिंपरी-१८.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

**सही/-**
**वैद्यकिय संचालक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

| या ठिकाणी पासपोर्ट साईज फोटो चिटकवावा. |
|---|

**प्रति,**
**मा.सदस्य सचिव,**
कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली
वेलफेअर सोसायटी पी.सी.एम.सी.
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत, पिंपरी- ४११ ०१८

**विषय- ---------------------------------------- या पदासाठी अर्ज**

**महोदय,**

संदर्भीय जाहीरातीनुसार मी -------------------------- पद ----------------------------------------- या तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असून निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

माझी तपशीलवार माहिति खालील प्रमाणे-

१) संपूर्ण नांव- ------------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा संपर्ण पत्ता-----------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

३) मोबाईल क्रमांक ----------------------------------------------------------------------

४) ई-मेल आयडी---------------------------------------------------------------------------

५) धर्म- ---------------------- ६) जात---------------------- ७) प्रवर्ग- -------------------

७) जन्मतारीख------------------------------- ८) लिंग – पुरुष / स्त्री

९) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०)  तांत्रिक व इतर अर्हता तपशील- -----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

११)  अनुभव तपशील-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बराबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकिची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावीत होईल, याची मला जाणीव आहे.

स्थळ- पिंपरी  
दिनांक-    / १०  /२०१७

अर्जदारची सही-  
(नांव-                                  )

सहपत्रे- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणत्रे
२) जातीचा दाखला
३) अनुभवाचे प्रमाणपत्र